# ‘मेट्रो ३’वरील २२ स्थानकांचे नामाधिकार कंपन्या, बँकांकडे

## ‘एमएमआरसी’ने निविदा मागवल्या

**लोकसत्ता प्रतिनिधी**

### १७ जुलैपर्यंत मुदत

कफ परेड, विधान भवन, काळबादेवी, गिरगाव, ग्रॅन्ट रोड, मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, विज्ञान संग्रहालय, आचार्य अत्रे चौक, वरळी, दादर, शितलादेवी मंदिर, धारावी, विद्यानगरी, सांताक्रूझ विमानतळ, सहार रोड, आंतरराष्ट्रीय विमानतळ, मरोळ नाका, एमआयडीसी, सीप्झ आणि आरे या २२ स्थानकांच्या नामाधिकारासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. १७ जुलैपर्यंत इच्छुक कंपन्यांना निविदा सादर करता येतील.

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) ‘कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३’ मार्गिकेतील २२ स्थानकांचे नामाधिकार खासगी कंपन्या, बँकांना देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. ही निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्थानकांच्या नामाधिकाराच्या माध्यमातून एमएमआरसीला चांगला महसूल मिळण्याची शक्यता आहे.

मेट्रो प्रकल्पाअंतर्गत तिकिटाव्यतिरिक्त अन्य स्त्रोतांतून महसूल मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. स्थानकांत, मेट्रो गाड्यांमध्ये जाहिरातीस परवानगी दिली जाते. खाद्यपदार्थ आणि इतर स्टॉलच्या माध्यमातूनही महसूल मिळवला जातो. त्याच वेळी विविध नामांकित कंपन्यांना मेट्रो स्थानकांचे नामाधिकार दिले जातात.

‘मेट्रो ३’ कार्यान्वित झाल्यानंतर अन्य स्त्रोतांतून महसूल मिळावा यासाठी ‘एमएमआरसी’ने प्रक्रिया सुरू केली आहे. पाच मेट्रो स्थानकांचे नामाधिकार २०२२ मध्येच विविध कंपन्यांना देण्यात आले आहेत.

कोटक महिंद्रा बँकेकडे वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो स्थानक, आयसीआयसीआय लोम्बार्डकडे सिद्धिविनायक मेट्रो स्थानक, आयुर्विमा महामंडळाकडे (एलआयसी) चर्चगेट आणि हुतात्मा चौक मेट्रो स्थानकाचे अधिकार देण्यात आले आहेत. या कंपन्यांना प्रसिद्धीसाठी मेट्रो स्थानकात जागा मिळणार आहे.